पुढारी

गुरुवार, २६ डिसेंबर २०२४



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे गुणवत्ता शिष्यवृत्ती वितरण समारंभात विद्यार्थिनीस पारितोषिक प्रदान करताना कवी अरुण म्हात्रे. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. जी. जे. नवाथे आदी. (छाया : नाज ट्रेनर)

# गुणवत्ता शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला प्रेरणा

## अरुण म्हात्रे; डॉ. बापूजी साळुंखे गुणवत्ता शिष्यवृत्तींचे वितरण

**कोल्हापूर :पुढारी वृत्तसेवा**

गुणवत्ता शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला प्रेरणा मिळते. ज्यांच्या घरात पुस्तकांचे कपाट आहे ते सर्वात श्रीमंत घर असते. त्यामुळे विद्यार्थीदशेत ज्ञानार्जन करावे व भविष्य सुखकारक करावे, असे प्रतिपादन कवी अरुण म्हात्रे यांनी केले.

विवेकानंद कॉलेजमधील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे गुणवत्ता शिष्यवृत्ती वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे होते. याप्रसंगी वरिष्ठ प्रा. एस. पी. थोरात, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, समन्वयक डॉ. कैलास पाटील उपस्थित होते. याप्रसंगी समारंभात ११ वी, १२ वी, पदवी व पदव्युत्तर स्तरावरील गुणवंत विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख प्रा. संदीप पाटील यांनी करून दिली. परीक्षा नियंत्रक डॉ. जी. जे. नवाथे यांनी आभार मानले. प्रा. समीक्षा फराकटे व प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

यावेळी डॉ. ए. बी. वसेकर, डॉ. बी. टी. दांगट, प्रा. विश्वंभर कुलकर्णी, प्रा. किशोर गुजर, आर. बी. जोग आदी उपस्थित होते.

26/12/2024

26/12/24